P.24 (12)

# प्रिंटींग एरिया

Peer Reviewed International Multilingual Research Journal

Issue-90, Vol-04, June 2022

Editor
Dr.Bapu G.Gholap

आंतरराष्ट्रीय बहुभाषिक शोध पत्रिका

# प्रिंटिंग एरिया

Printing Area International Interdisciplinary Research Journal in Marathi, Hindi & English Languages

May 2022, Issue-90, Vol-04

**Editor**
**Dr. Bapu g. Gholap**
(M.A.Mar.& Pol.Sci.,B.Ed.Ph.D.NET.)

**Guest Editor**
**Dr. Vaishali Eknathrao Aher**
Head, Dept. of English
Saraswati Mahavidyalaya kaij, dist.Beed.

"Printed by: **Harshwardhan Publication Pvt.Ltd.** Published by **Ghodke Archana Rajendra** & Printed & published at Harshwardhan Publication Pvt.Ltd.,At.Post. Limbaganesh Dist,Beed -431122 (Maharashtra) and Editor **Dr. Gholap Bapu Ganpat.**

Reg.No.U74120 MH2013 PTC 251205

**Harshwardhan Publication Pvt.Ltd.**
At.Post.Limbaganesh,Tq.Dist.Beed
Pin-431126 (Maharashtra) Cell:07588057695,09850203295
harshwardhanpubli@gmail.com, vidyawarta@gmail.com

All Types Educational & Reference Book Publisher & Distributors / www.vidyawarta.com

14) CHILD LABOUR (PROHIBITION OF CERTAINEMPLOYMENT TO CHILDREN ) AND....
Sri S.K Rout, Dr. D.K. Misra, Raigarh ||61

15) टिळकांचे राष्ट्रवाद वा सांस्कृतिक राष्ट्रवादाबद्दलचे विचार
डॉ. कोकिळा पाटील, बामखेडा ||70

16) मारुती चित्तमपल्लीचे निसर्गमय जीवनानुभव
प्रा. डॉ. सचिन अशोक पाटील, एरंडोल ||73

17) सुर्वेच्या कवितेतील शोषणग्रस्त माणूस
प्रा. डॉ. सुनिता पांडुरंग सुर्यवंशी, नातेपुते, जि. सोलापूर. ||74

18) संत गाडगे बाबांचे कीर्तन आणि ग्रामस्वच्छतेची भूमिका
प्रा. डॉ. दीपक शिंदे, गिमेकर मनोजकुमार पंढरीनाथ, नांदेड ||76

19) स्वतंत्रता संघर्ष और हिंदी साहित्यकार
डॉ. शेख शहेनाज अहेमद, नांदेड (महाराष्ट्र) ||82

20) सूखा बरगद उपन्यास में मुस्लीम मानसिकता का चित्रण
डॉ. देशमुख दस्तगीर सरदारमियां, औरंगाबाद ||85

21) उच्च शिक्षा के लिये समाज की जड़ मजबूत करें
डॉ. गीता शर्मा, जबलपुर ||93

22) महिलाओं की आर्थिक–सामाजिक स्थिति का उनके उच्चतर माध्यमिक विद्यालय....
मधु तोमर, डॉ. मनीषा पाण्डे, बजरंगगढ़, गुना (म.प्र.) ||96

23) राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचे विचार
प्रा. अंशुमती भास्करराव पेंडोखरे, अंजनगाव सूर्जी, जिल्हा अमरावती ||99

24) नक्षलवाद : अंतर्गत सुरक्षितते पुढील आव्हान
प्रा. एस. आर. पाटील, नगाव जि. धुळे ||102

25) खेळामुळे समाज व संस्कृतीची जोपासना
प्रा. डॉ. डापके कृष्णा देवाजी, जाफ्राबाद, जिल्हा जालना. ||104

26) प्रतिरोध के स्वर और कात्यायनी की कविता
अनिल कुमार अग्रवाल, सरमथुरा, धौलपुर (राजस्थान) ||106

www.vidyawarta.com/03 http://www.printingarea.blogspot.com

माताओं के बालक–बालिकाओं में अध्ययन के प्रति भिन्न–भिन्न आदतों का निर्माण होता है इसलिए महिलाओं की सामाजिक–आर्थिक स्थिति का अशासकीय विद्यालय में अध्ययनरत बालक–बालिकाओं की शैक्षिक उपलब्धि में सार्थक अन्तर पाया जाता है।

**सुझाव :**

(१) परिवार का वातावरण बच्चों के अध्ययन के लिए उत्तम होना चाहिए जिससे उनकी शैक्षिक उपलब्धि बढ़ सके।

(२) शिक्षकों को भी विद्यार्थियों को अच्छे से अध्ययन करवाना चाहिए ताकि वे उच्च शैक्षिक उपलब्धि प्राप्त कर सकें।

(३) बच्चों को अपनी माताओं की आर्थिक स्थिति देखकर संतोष के साथ रहकर अध्ययन में मन लगाना चाहिए चाहिए।

(४) शिक्षकों को विद्यार्थियों का समय–समय पर टेस्ट लेना चाहिए।

**संदर्भ सूची**


➢ बोहरा, वंदना ;२००७द्धण ''रिसर्च मैथडोलौजी'' ओमेक्स पब्लिकेशन, अंसारी रोड, नई दिल्ली।

➢ डौडियाल, सच्चिदानन्द ''शैक्षिक अनुसंधान का विधि शास्त्र'' राजस्थान हिन्दी ग्रन्थ अकादमी जयपुर।

➢ गर्ग, ओ.पी., चतुर्वेदी, एस. ;२००७द्धण ⁄अधिगम का मनो–सामाजिक आधार एवं शिक्षा'' अपोलो प्रकाशन, गाजियाबाद।

➢ माथुर, एस. एस., (२००५). ''शिक्षा मनोविज्ञान'', विनोद पुस्तक मंदिर, आगरा


❑❑❑

**23**

# राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचे विचार


**प्रा. अंशुमती भास्करराव पेंडोखरे**

श्रीमती राधाबाई सारडा कला वाणिज्य
व विज्ञान महाविद्यालय, अंजनगाव सुर्जी,
जिल्हा अमरावती


***********

**प्रास्ताविक**

महाराष्ट्र ही संतांची भूमी म्हणून ओळखली जाते. या महाराष्ट्रात अनेक संत, समाजसुधारक होऊन गेले. संतांनी आपल्या विचारातून, किर्तनातून, अभंगातून मोठया प्रमाणावर प्रबोधन केले आहे. सामाजिक जीवन अध:पतित होत चालले होते तेंव्हा अशा वेळी महाराष्ट्रातील समाजजीवनात योग्य मार्ग दाखविण्याचे कार्य संतांनी केले. अज्ञानाच्या आणि अंधश्रध्देच्या खायेत अडकलेल्या समाजाला बाजूला काढण्याचे काम संतांची केले. यामध्ये संत ज्ञानेश्वर, संत नामदेव, संत एकनाथ, संत तुकाराम,संत गोरोबाकाका, संत चोखामेळा, संत सावतामाळी या विभूतींचा आवर्जून उल्लेख करावा लागतो. याच धर्तीवर राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचे कार्य, विचार उपयुक्त आहे हे लक्षात येते. राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी 'ग्रामगीता' मधून खेडयाची सुधारणा झाली तरच देशाची सुधारणा होईल म्हणून खेडी सुधारण्यासाठी प्रयत्न झाला पाहीजे असे त्यांना वाटते. राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी ग्रामगितेमधून सर्व मानव प्राण्याला सुखी जीवन जगण्याचा अनमोल विचार सांगितला आहे. तसेच विश्वबंधूत्वाचा हा विचार त्यांनी मांडलेला दिसून येतो.

त्यांच्या ग्रामगितेमधून विविध स्वरुपाचे विचार आढळून येतात ते पूढील प्रमाणे आहेत.

**१. ग्रामीण समाजाच्या उन्नती विषयी राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचा विचार :–**

भारत हा कृषीप्रधान देश असल्याने इथला

शेती हा मुख्य व्यवसाय आहे. जागतीकीकरणामुळे यंत्रयुगाची सुरुवात मोठया प्रमाणात झाली आहे. विज्ञान, तंत्रज्ञान खेडयापर्यंत पोहचले आहे. प्रत्येक क्षेत्रात स्पर्धा आहे. विज्ञान तंत्रज्ञानाचा विकास, बहुराष्ट्रीय कंपन्याचे आगमन यामुळे जागतिक स्तरावरचे वातावरण ढवळून निघाल्यामुळे कामगारांची दयनीय अवस्था पहावयास मिळते शेतामध्ये यंत्राची अवजारे मागणी वाढल्यामूळे कामगार वर्ग बेकार झाला.

**२. राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचा आदर्श कृषीविषयी विचार :—**

भारत देशात आजही लोक खेडयामध्ये राहतात. त्यांचा शेती हा प्रमुख व्यवसाय आहे. शेतीला पूरक व्यवसाय पशूपालन केले जात होते. बैलाचा उपयोग शेतामध्ये नांगरणी, पेरणी, मोगडणी इ. कामा साठी होत असे पण आज शेतकऱ्यांकडे विविध यंत्रे, अवजारे, ट्रॅक्टर शेतीसाठी या गोष्टी उपलब्ध झाल्या आहेत. यंत्रयुगाविषयी तुकडोजी महाराज म्हणतात.

''सर्वथैव यंत्रानीच काही !
शेती सुखकर होणार नाही !
गावची संपत्ती गावी राही !
सुगम तो मार्ग उत्तम !''

शेतकरी, शेतमजूर, कारागीर, यांचे जीवन शेतीवर अवलंबून आहे. म्हणून यांची सुधारणा करावयाची असेल तर षेती सुधारल्याशिवाय पर्याय नाही असे महाराजांना वाटते. आज 'काळी आई' दुष्टचक्रात सापडली आहे. अनेक लोकांना पोसण्याचे काम शेती करत आलेली आहे. परंतू शेती आणि शेतकरी दोन्हीही अडचणीत आला आहे. यंत्राव्दारे शेती होऊ लागल्यामुळे भूमिहीन, शेतमजूर अडचणीत आला म्हणून तुकडोजी महाराज म्हणतात, शेतामध्ये सर्वच ठिकाणी यंत्राचा वापर सर्वसामान्यांना परवडणारे नाही. यंत्रामुळे गावातील नैसर्गिक साधन संपत्तीचा नाश होत आहे. त्याची जोपासना करायला हवी. महाराजांनी ग्रामगितेमधून भू सुधारणा विषयी विचार मांडलेला दिसून येतो. उत्पादनाची गती खुंटली उपभोगाची भावना वाढली काय करील भुमाताभली मशागत नसता जमिनीची मानवाला कष्ट नको फुकट हवं आहे. कष्ट न करता जगता आलं पाहिजे अशी वृत्ती माणसामध्ये निर्माण झाली आहे. शेतीमध्ये कष्ट केल्यानंतर भरपूर उत्पन्न मिळते पण तसे न होता मानव अधोगतीकडे जात आहे. म्हणून तुकडोजी महाराज सर्वांना शेतीत काम करण्याचा सल्ला देतात.

**३. राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचे आरोग्याविषयी विचार —**

सध्याचे युग धावपळ आणि ताणतणावाचे आहे. जागतिकीकरणामुळे मानव घडयाळाच्या काटयावर धावू लागला आहे. धावपळीमुळे सकस आहार घेण्यासाठी सुध्दा मानवाला वेळ उपलब्ध नाही. पैसा कमावण्याच्या विचारामध्ये तो स्वतःच्या शरीर संपत्तीकडे दुर्लक्ष करत आहे. म्हणून त्याचे वाईट परीणाम मानवाला भोगावे लागत आहेत. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज सांगतात की,

''सोने, मोती रेशीम जरी ! सौंदर्य प्रसाधने बहुपरी !
त्या सर्वाहूनी शतपटीने बरी! आरोग्याची टवटवी !!

मानवी जीवन हे अनमोल आहे पण प्रत्येक व्यक्तीला सोने, मोती, रेशीम यांचा मोह जडला आहे. पण याचा मानवी जीवनामध्ये कांहीही फायदा नाही. सोन्य चांदी पेक्षा मानवी जीवनात आरोग्य महत्वाचे आहे. शरीर संपत्ती मानवाला मिळालेली खूप मोठी देणगी आहे. म्हणून मानवाने बाहय वस्तूकडे डोळेझाक करुन त्याचा त्याग करावा आणि आरोग्याची काळजी घ्यावयास सांगतात यशस्वी जीवनासाठी निरोगी आरोग्य महत्वाचे आहे. राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी मानवाच्या आरोग्या बरोबरच गुरेढोरे यांच्या आरोग्याविषयी म्हणतात,

''गुराढोरांची औशधे जाणती !
साहय द्यावे त्या ग्रामिणा—प्रति !
अनुभूत नुकसे लोकगितादी किती !
संग्रह त्यांचा करावा !!

यावरुन त्यांचे पशूवरील, प्राण्यावरील प्रेम दिसून येते. तसेच निकृष्ठ आहार आरोग्यास हानिकारक आहे असेही सांगतात.

''हॉटेली खाणे मसणा जाणे !
ऐसे बोलती शहाणे !
त्यावरि नाना तिखट व्यसने !
आग्यावेळासारखी ! ११

यातून मानवाच्या जीवन पध्दतीविषयी विचार मांडला आहे. यामूळे आपले आरोग्य बिघडते असे सांगतात.

आज कृत्रिम पदार्थानि मानवाचे जीवन व्यापून गेले आहे. याविषयी महाराज म्हणतात,

''कृत्रिम दूध — लोणी कांही !
गोरसतुल्य ठरणार नाही !
नाना रोग वाढती देही !
न कळता कृत्रिमतेने !!

यामूळे त्याचा वाईट परिणाम आरोग्यावर होवून मानवी शरीराला रोग जडत आहे असे सांगतात.

**४. राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचे व्यसनाधिनते विषयी विचार :—**

तुकडोजी महाराजांनी मानवाच्या उत्कर्षाविषयी सुंदर मोलाचा उपदेश केला आहे. पण आजच्या काळात प्रत्येकजण धावतो आहे. कुठे जायचंय? काय करायचंय याच भान राहिलेले नाही. आज अनेकजन व्यसनाधिनतेकडे वळलेले आहेत. व्यसनामूळे आयुष्याची आणि कुटुंबाची कषी धूळधाण होते. ते ग्रामगीतेमध्ये सांगितले आहे.

''मजूर कष्टाने पैसा मिळविती !
तोहि दारुपायी उधळिती !
मुलाबाळा उपवास पडती !
होय दुर्गती जीवनाची !! —८४

आज व्यसनापायी अनेक कुटुंबे उध्वस्त झाली आहेत. गावातील पुढारी दारुपितो त्याविषयी म्हणतात,

''गावचा मुखंड दारुप्याला !
म्हणूनि व्यसन लागले बहुतेकाला
मग सर्व गावची लागला !
गटार गंगे मार्गी !! —८८

दारु पिणाऱ्यांची संख्या मोठया प्रमाणात वाढत आहे म्हणून महाराज म्हणतात,

''पैसा अडका नष्ट झाला !
ऐसा गाव उन्नतिस चढला !
सगळया गावाचाचि धिंगाणा केला !
दारु बाजांनी —८९

व्यसनी लोकांची संख्या वाढल्यामुळे गावातील रितीरिवाज बदलले जातात. पैसा नसल्यामुळे गावाची प्रगती कशी होणार? याची चिंता राष्ट्रसंत करतात. तुकडोजी महाराजांनी मोलाचा संदेश ग्रामगितेतून लोकांना दिला आहे. ते म्हणतात '' व्यसने सगळी सोडूनी द्या, सरळपणाचे जीवन जगा, लोभ करा सर्वांचा.' तरुण मुलेही व्यसनाधिनतेच्या आहारी गेल्यामुळे समाजाला त्याचे दुष्परिणाम भोगावे लागतात ''असे महाराज म्हणतात. सारांश संत तुकडोजी महाराजांच्या ग्रामगिते मधून विविध स्वरुपाचे विचार सांगितलेले दिसून येतात.

**संदर्भ यादी**


१. मानवतेचे महापुजारी,: राष्ट्रसंत तुकडोजी (जीवन व कार्य) कडवे प्रा. रघूनाथ — अमोल प्रकाशन नागपूर.

२. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज — (संपा.) सगणे शांताराम अमृत महोत्सव विशेषांक लोकराज्य. मासिक

३. जागतिकीकरणाच्या काळात ग्रामगीतेची यथार्थता: एक अभ्यास — श्री. तुळशीराम चंद्रसेन उकिरडे


❑❑❑







Indexed

IMPACT 8.012 Iijif FACTOR

Publisher & Owner
Archana Rajendra Ghodke

Harshwardhan Publication Pvt.Ltd.

At.Post.Limbaganesh, Tq.Dist.Beed

Pin-431126 (Maharashtra)
vidyawarta@gmail.com

Cell : 098 50 20 32 95

& Edit By

Dr.Gholap Bapu Ganpat

ISSN 2394-5303